९ NOV 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाचे उपकेंद्र

## चंदगडमध्ये बैठक : कौशल्यांवर आधारित अभ्याक्रमांचा विचार

▶सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ८ : सीमाभागातील चंदगड, गडहिंग्लज, आजारा तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठ उपकेंद्र सुरू करण्याच्या तयारीत आहे. या केंद्राच्या माध्यमातून विविध कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम राबविले जाणार आहे. त्याच्या प्राथमिक तयारीची बैठंक मंगळवारी चंदगड तहसीलदार कार्यालयात झाली. त्यासाठी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य, तालुक्यातील अधिकारी उपस्थित होते

चंदगड, गडहिंग्लज, आजारा तालुका जिल्हा कार्यक्षेत्रापासून १०० किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे या भागातील बहुतांशी युवक-युवती आपले शिक्षण अपूर्ण सोडून नोकरीच्या निमित्ताने पुणे, मुंबई, गोवा या ठिकाणी स्थलांतर होतात. या तालुक्याला नैसर्गिक साधन संपत्ती लाभली आहे; पण या माध्यमातून आपण चांगल्याप्रकारे कसा व्यवसाय सुरू करू शकतो याचे प्रशिक्षण त्यांना मिळत नाही. ते लक्षात घेऊन येथील विद्यार्थ्यांसाठी उपकेंद्राद्वारे कौशल्यपूर्ण अभ्यासक्रम राबविण्याचा विचार विद्यापीठाने केला आहे. तालुका स्वयंपूर्णतिकडे जावा, कोणत्याही विद्यार्थ्याला २० किलोमीटरच्या पुढे शिक्षण घेण्यासाठी जायला लागू नये. यासाठी विद्यापीठ जे सहकार्य लागेल ते करण्यासाठी तयार आहे. बांबू व्यवसाय, काजू प्रक्रिया, नाचणी उत्पादक या माध्यमातून निर्माण करू शकतो, असे व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी सांगितले.



कोल्हापूर : सीमाभागात शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू करण्याबाबत मंगळवारी चंदगड तहसीलदार कार्यालयात व्यवस्थापन परिषद सदस्य आणि अधिकारी यांची बैठक झाली.

### नागरिकांची मते जाणून घेणार

■ लवकरच येथील युवक-युवतींना कोणता अभ्यासक्रम, प्रशिक्षण हवे आहे. तेथील नागरिकांचे मताचा विचार करून अभ्यासक्रम तयार करून व्यावसायिक व रोजगारनिर्मिती मोठ्या प्रमाणात करण्याचे नियोजन असल्याचे परुळेकर यांनी सांगितले.

रोजगारनिर्मिती आणि या भागातील व्यावसायिक निर्माण व्हावेत, असा या उपकेंद्रामागील उद्देश असल्याचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. अमरसिंग रजपूत, ॲड. स्वागत परुळेकर यांनी सांगितले. या वेळी चंदगडचे नायब तहसीलदार अशोक पाटील, कृषी अधिकारी माने, मंडल अधिकारी सलगर, तलाठी खटावकर, विद्यापीठ कौशल्य विकास केंद्राचे समन्वयक प्रा. आर. जी. पवार, कौशल्य विकास अधिकारी प्रमोद कांबळे उपस्थित होते.

9 NOV 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सीमाभागात कौशल्याधिष्ठीत उपकेंद्र उभारण्यास विद्यापीठ प्रयत्नशील



कोल्हापूर : सीमाभागात कौशल्यावर आधारित उपकेंद्र उभारणीसाठी झालेल्या बैठकीला उपस्थित व्यवस्थापन परिषद सदस्य सिध्दार्थ शिंदे, अमरसिंह रजपूत, स्वागत परुळेकर आदी

- व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांची बैठकीत विद्यापीठाची माहिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या माध्यमातून सीमा भागात असणाऱ्या चंदगड, गडहिंग्लज, आजरा या तालुक्यातील युवक-युवतीसाठी विद्यापीठाच्या माध्यमातून कौशल्यावर आधारित एक उपकेंद्र निर्माण करून या भागातील युवक-युवतीसाठी कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम निर्मिती करून रोजगारास / व्यवसायास चालना मिळण्यासाठी शिवाजी विद्यापीठ प्रयत्नशील आहे, अशी माहिती व्यवस्थापन परिषद सदस्यांच्या बैठकीत देण्यात आली.

चंदगड तहसील कार्यालय येथे तालुक्यातील प्रमुख अधिकरी वर्ग व विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य यांची महत्वपूर्ण बैठक या विषयावर झाली. प्रामुख्याने हे तालुके जिल्हा कार्यक्षेत्रापासून १०० किमी अंतरावर आहेत. यामुळे या भागातील बहुतांशी युवक युवती आपले शिक्षण अपूर्ण सोडून नोकरीच्या निमित्ताने पुणे, मुंबई, गोवा या ठिकाणी स्थलांतर होतात. या तालुक्याला नैसर्गिक साधन संपत्ती लाभलेली आहे पण या माध्यमातून आपण चांगल्याप्रकारे कसा व्यवसाय सुरु करू शकतो याचे प्रशिक्षण यांना मिळत नाही.

तालुका स्वयंपूर्णतेकडे जाता, कोणत्याही विध्यार्थाला २०किमीच्या पुढे शिक्षण घेण्यासाठी जाऊ लागू नये यासाठी विद्यापीठ जे सहकार्य लागेल ते करण्यासाठी तयार आहे. बांबू व्यवसाय, काजू प्रकिया व्यवसाय, नाचणी उत्पादक यांचे नामवंत ब्रांड आपण या माध्यमातून निर्माण करू शकतो, असे विचार व्यवस्थापन परिषदेचे राज्यपाल नियुक्त सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी या बैठकीमध्ये मांडले.